# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०१/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. सावनेर** – अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील वार्ड नं १४ माताखेडी सावनेर दिनांक २५/०६/२०२२ चे १७.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे– चिंतामन लोळबाजी आलोने वय ५९ वर्ष, रा. वार्ड नं. १४ माताखेडी सावनेर यांचा पीडित मुलगा लकी चिंतामन आलोने वय १६ वर्षे, रा. वार्ड नं. १४, माताखेडी सावनेर ता. सावनेर जि. नागपूर यास त्यांच्या सावनेर येथील राहते घरातुन अज्ञात आरोपीने त्याचा अज्ञातपणाचा फायदा घेउन फुस लाउन पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव मो.क्र. ९४२३६०२९८७ करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील कुही ते वडोदा रोड अंबाडी बस स्टॉप जवळ येथे दिनांक १२/०६/२२ चे १३.५० वा. ते १४.०० वा. सुमारास एम.एच.–४०/एम.–३४०४ क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक संदीप अमरूत चकोले(मृतक), वय २७ वर्ष, केशोरी ता. मौदा यांचे सोबत विकास जिवन शेन्डे, वय २४ वर्ष, रा. आसलवाडा ता. कामठी हे दोघेही कंपनीतुन काम करुन घरी जाण्याकरीता निघाले. वडोदा कुही रोड स्मशान भुमीवर मोटरसायकल खराब झाल्याने रोडच्या डाव्या बाजूने पायदळ चालत असता अंबाडी शिवार बस स्टाप जवळील श्री हाउसींग लेआऊट समोरील रोडवर कुही कडुन येणारी एम.एच.–४०/बीवाय–९३४९ क्रमांकाची प्लसर मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– सुरेश सुदाम आंबिलडूके, वय २५ वर्ष, रा. भुगाव याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून मागून येवून एम.एच.–४०/एम.–३४०४ क्रमांकाचा मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक संदीप चकोले हा मरण पावला व याच्या मागे बसलेला विकास शेन्डे हा जखमी झाला. तर आरोपी सुरेश आंबिलडूके व सोबती अभिलाश कंटीराम आंबिलडूके, वय २५ वर्ष, रा. भुगाव हे जखमी आहेत.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनी जगदीश बिरोले पोस्टे मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी जखमी असल्याने अटक नाही. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सोनेकर मो.क्र. ८२०८३३५१९४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर